

10 मीटर एअर रायफल स्पर्धेत हरियाणाच्या दीपक सैनीला सुवर्ण पदक

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | सोमवार दिनांक 18/08/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 184 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# जम्मू-काश्मीरमध्ये पुन्हा ढगफुटी! सात जणांचा मृत्यू

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**जम्मू-काश्मीर : जम्मू आणि काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यात काही दिवसांपूर्वीच ढगफुटीची घटना घडली होती, ज्यामध्ये सुमारे ६५ लोकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर आथा पुन्हा एकदा कठुआ जिल्ह्यातील एका दुर्गम गावात शनिवार आणि रविवारच्या रात्री ढगफुटीची घटना घडली आहे.**



या दुर्घटनेत किमान ७ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.राजबागच्या जोड घाटी गावात ढगफुटीची घटना घडली. यामुळे गावाचा संपर्क तुटला असून काही मलमत्ता आणि जमिनीचे नुकसान झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. पोलीस आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF) यांची संयुक्त पथके घटनास्थळी दाखल झाली असून स्थानिकांच्या मदतीने रविवारी सकाळी बचावकार्य सुरू होते.जिल्ह्यात झालेली ढगफुटी आणि भुस्खलन यानंतर जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी प्रशासनाला बचाव आणि मदतकार्य करण्याचे आणि नागरिकांची सुरक्षितता निश्चित करण्याचे निर्देश दिले आहे.

तसेच त्यांनी पीडित कुटुंबांबद्दल संवेदना व्यक्त केल्या आहेत आणि जखमी नागरिक लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना केली आहे.

मुख्यमंत्र्यांनी कठुआ जिल्ह्यात तसेच जोध खेड आणि जुथना येथे भूस्खलनामुळे झालेल्या जीवितहानीबद्दल आणि नुकसानीबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केले आहे.

या दुर्घटनेत ४ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. मुख्यमंत्र्यांनी शोकाकुल कुटुंबीयांबद्दल संवेदना व्यक्त केल्या असून, जखमींच्या लवकरात लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना केली आहे. तसेच, बाधित कुटुंबांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

# रोजगार निर्मितीसाठी आयटी पार्क उभारण्यात येईल - मुख्यमंत्री

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**सोलापूर : सोलापूरमध्ये आयटी पार्क उभे केल्यास युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल. जिल्हा प्रशासनाने उत्तम जागा शोधल्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून आयटी पार्क उभारण्यात येईल आणि इथे आयटी उद्योग आणण्यात येतील.**



शहरात उद्योगासाठी आवश्यक चांगले रस्ते आणि विमानसेवा उपलब्ध झाल्याने इथल्या औद्योगिक विकासावर भर देण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)अंतर्गत म्हाडातर्फे उभारण्यात आलेल्या दहिटणे येथील राष्ट्रतेज अटल कामगार गृहनिर्माण सहकारी संस्थेअंतर्गत १ हजार १२८ आणि शेळगी येथील श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रीय समाज महालक्ष्मी गृहनिर्माण सहकारी संस्थेअंतर्गत २२० अशा एकूण १ हजार ३४८ सदनिकांच्या वितरणप्रसंगी ते बोलत होते.कार्यक्रमाला पालकमंत्री जयकुमार गोरे, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील, आमदार सर्वश्री दिलीप सोपल, सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख, रणजितसिंह मोहिते पाटील, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, अभिजित पाटील, देवेंद्र कोठे, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद शंभरकर आदी उपस्थित होते.सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात येत असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सोलपूरमध्ये बंद जलवाहिनीने पाणी आणण्यात येणार आहे.

सांडपाणी प्रकल्पाच्या जागेचा प्रश्न दूर करण्यात आला असून ते कामही सुरू करण्यात आले आहे. शहरातील जल वितरण वाहिनीच्या ८५० कोटीच्या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे.

सोलापूर शहरातील नागरिकांना दररोज शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे, असे प्रयत्न करण्यात येत आहेत. विमानतळाचे अतिरिक्त कामही लवकरच करण्यात येणार आहे.

# संस्कृती, समाजस्वास्थ्य टिकवण्यात लोककलावंतांचे योगदान

## डॉ. भावार्थ देखणे यांचे प्रतिपादन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे: "भारतीय संस्कृती, परंपरा प्राचीन आहे. लोककला, लोकसाहित्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असताना अधिक समृद्ध होते. संस्कृती, समाजाचे स्वास्थ्य टिकवण्याचे काम लोककलावंत करत असतात. त्यामुळे जागतिक स्तरावरील ज्ञान घेतानाच आपल्या संस्कृती, परंपरेला जपायला हवे," असे प्रतिपादन लोककलेचे अभ्यासक व आळंदी देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांनी केले**




गोंधळी व भटक्या विमुक्त जाती-जमाती विकास संघातर्फे हरीश पाचंगे लिखित, वेदांतश्री प्रकाशन प्रकाशित 'गोंधळ एक कुलाचार' या पुस्तकाचे प्रकाशन, पद्मश्री पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. व्यंकप्पा सुगतेकर यांचा सत्कार व समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. घोले रस्त्यावरील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गिरीश प्रभुणे, लोककलेचे अभ्यासक डॉ. भावार्थजी देखणे, पद्मश्री दादासाहेब इदाते, अखिल भारतीय स्वामी समर्थ सेवा अध्यात्मिक विकास केंद्राचे संचालक सतीश मोटे, प्रकाशक सुनील उंब्रजकर, संघाचे अध्यक्ष परेश गरुड, उद्योजक धर्मनाथ गायकवाड, मयूर शेळके आदी उपस्थित होते.

डॉ. भावार्थ देखणे म्हणाले, "आजही महाराष्ट्राच्या गावागावांत कीर्तन, प्रवचने होतात. वारकरी संप्रदायाला हजार वर्षांची परंपरा आहे. विविध लोककलांचे सादरीकरण होते. या परंपरा कायम ठेवणे अतिशय महत्त्वाचे आहे. रुढी आणि परंपरा यातील फरक समजून घ्यावा. आपला समाज अनुकरणप्रिय असल्याने अयोग्य गोष्टींना थारा देऊ नये. निरामय पद्धतीने हे काम पुढे घेऊन जायला हवे. समाजाचे जीवन उन्नत करण्याचे काम लोककलावंतांनी यापुढेही अविरतपणे सुरु ठेवावे. गोंधळी हे खऱ्या लोकधर्माचे पुरोहित आहेत."

डॉ. गिरीश प्रभुणे म्हणाले, "लोककलावंत समाजाचे प्रबोधन करीत असतात. त्यांच्या कलाद्वारे लोकमानसावर थेट परिणाम घडतो आणि समाजातील अंधश्रद्धा, कुप्रथा व अन्यायकारक गोष्टींविरुद्ध जागृती निर्माण होते. लोककलेतून समाजपरिवर्तन घडविण्याची ताकद असते. ग्रामीण भागातील संस्कृती, परंपरा आणि सामाजिक समस्यांचे प्रतिबिंब लोककलांमध्ये दिसते. त्यामुळे समाजातील बदलत्या परिस्थितीनुसार लोककला जिवंत ठेवणे आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोचवणे गरजेचे आहे."

डॉ. व्यंकप्पा सुगतेकर यांनी नागरी सत्काराने भारावून गेलो असल्याचे सांगितले. कानडी भाषेतून सादर केलेल्या भावपूर्ण गोंधळी गीताने त्यांनी उपस्थितांची मने जिंकली. सतीश मोटे यांनीही मनोगत व्यक्त केले. सुरुवातीला विद्यार्थ्यांच्या संबळ वादन, गणेशवंदना, देवीची प्रार्थनेने सभागृहात भाव-भक्तिमय वातावरण तयार झाले.

# मला 'मदर इंडिया'ची भूमिका करायला आवडले असते - आशा पारेख

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : 'आपल्याकडे सकस साहित्यावर बेतलेले चित्रपट लोकांच्या पसंतीस उतरले आहेत,' असे मत ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांनी शनिवारी व्यक्त केले. त्यामुळे तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले, तरी चित्रपटामध्ये कथेला महत्त्व आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.**



'चित्रपट क्षेत्रात कृष्णधवल काळापासून आताच्या एआयपर्यंत झालेल्या विविध बदलांची मी साक्षीदार आहे. मी आजही चित्रपट पाहते, पण माझ्या दृष्टीने कृष्णधवलचा जमाना हा सुवर्णकाळ होता,' असे मत पारेख यांनी व्यक्त केले.पूना गेस्ट हाउस स्नेहमंच, कोहिनूर कट्टा आणि विदिशा विचार मंच यांच्या वतीने रविवारी (१७ ऑगस्ट) कोहिनूर ग्रुपचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते 'कोहिनूर रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. त्यानिमित्त आशा पारेख यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्या वेळी त्या बोलत होत्या.

'आई फर्ग्युसन महाविद्यालयात शिक्षण घेत असताना माझे वडील तिला भेटायला यायचे. त्यांचे आंतरधर्मीय लग्न ही त्या काळातील एक क्रांतिकारी गोष्ट होती.

मात्र, माझे आजोबा चित्रपटांना अर्थसाह्य करणारे असल्यामुळे चित्रपटात काम करण्याबद्दल मला घरातून विरोध होण्याचा प्रश्न नव्हता. स्वतःहून चित्रपटात काम करण्याची आलेली संधी मी स्वीकारली.गुरुदत्त, राजेश खन्ना, देव आनंद, शम्मी कपूर यांच्याबरोबर काम करता आले, याचा आनंद आहे.

मला अनेक चांगल्या भूमिका करता आल्या, पण तरीही मला 'मदर इंडिया'ची भूमिका करायला नक्कीच आवडले असते,' असे पारेख यांनी सांगितले.

# इंद्रायणी युवा प्रतिष्ठान आयोजित दहीहंडीला उत्स्फूर्त प्रतिसाद !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

इंद्रायणी युवा प्रतिष्ठान आयोजित भव्य दहीहंडी उत्सव २०२५ मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा झाला. (दि. १६ ऑगस्ट २०२५) रोजी वार शनिवार इंद्रायणी नगर भोसरी येथे इंद्रायणी युवा प्रतिष्ठान वतीने दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आला होता. हजारो च्या संख्येने गोपाळ भक्तांनी या सार्वजनिक उत्सवाला हजेरी



लावली तसेच उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.यावेळी प्रमुख आकर्षण म्हणून अभिनेत्री त्रिधा चौधरी ( फेम - आश्रम, द चार्जशीट, बंदिश बॅंडिट्स ) व अभिनेत्री जिया शंकर ( फेम - वेड, बिगबॉस हिंदी, ओटीटी २०२३) यांनी हजेरी लावली.

याप्रसंगी सचिन भैय्या लांडगे (कामगार नेते), अजित दामोदर गव्हाणे (मा. नगरसेवक), शामजी अगरवाल (उद्योजक), सुलभा ताई उबाळे ( उपगट नेत्या - शिवसेना शिंदे गट), रवी भाऊ लांडगे (बिनविरोध नगरसेवक), सीमा ताई सावळे ( मा. नगरसेविका), विलास मडीगेरी (मा. नगरसेवक) आदी मान्यवर उपस्थित होते.

दहीहंडी फोडण्याचा मान झित्राई देवी गोविंदा पथक चाकण, झित्राई मळा संस्थापक अध्यक्ष सत्यवान बनकर यांना मिळाला.

# सोनसाखळी चोरणारी टोळी जेरबंद; हत्येच्या गुन्ह्याची उकल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी- चिंचवड : सोनसाखळी हिसकावणाऱ्या टोळीला पिंपरी- चिंचवड गुन्हे शाखा युनिट तीन च्या पथकाने बेड्या ठोकल्या आहेत. आरोपींकडून १२ लाखा ३१ हजारांचे १० तोळे सोन्याचे दागिने पोलिसांनी जप्त केले आहेत. अहिल्यानगरमधील सुपा येथे सोनसाखळी हिसकावताना मे महिन्यात महिलेचा रस्त्यावर पडून मृत्यू झाला होता. असे एकूण वेगवेगळे १५ गुन्हे उघडकीस आले आहेत.




याप्रकरणी अक्षय राजू शेरावत, ऋषी बुद्धिमान नानावत, अरमान प्रल्हाद नानावत आणि सोनू फिरोज गुडदावत यांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. चोरीतील सोनसाखळी, सोन्याचे दागिने विकत घेणारा सराफ खुशालसिंग जोधसिंगराव ला देखील पोलिसांनी अटक केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चार ही आरोपी हे पादचारी एकट्या महिलेला हेरून तिच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून पळ काढत असायचे. आत्तापर्यंत पुणे ग्रामीण, अहिल्यानगर, पिंपरी- चिंचवड परिसरात सोनसाखळी हिसकावल्याचे गुन्हे उघडकीस आले आहेत. दरम्यान, २० मे २०२५ रोजी अहिल्यानगर सुपा येथे आरोपी अक्षय आणि ऋषी नानावत यांनी महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावताना महिला रस्त्यावर पडून गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. या प्रकरणी दोघांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल आहे. त्यांना सुपा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आलं आहे.

चार ही आरोपींना म्हाळुंगे परिसरातून बेड्या ठोकण्यात आल्या. ही कामगिरी पोलीस उपायुक्त शिवाजी पवार, सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या टीमने केली आहे.

# हरवलेला मोबाईल मालकांच्या ताब्यात ; पुणे पोलिसांची कारवाई

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे - शहरातील नागरिकांचे हरवलेले मोबाईल शोधून परत करण्याची मोहिम पुणे पोलिसांकडून सातत्याने राबवली जाते. स्वातंत्र दिनाचे औचित्य साधून शिवाजीनगर पोलिसांनी तब्बल ५ लाख रुपये किमतीचे ४१ मोबाईल संबंधित मालकांच्या ताब्यात परत दिले.शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक महेश बोळकोटगी यांच्या मार्गदर्शनाखाली परिसरातील



गहाळ मोबाईलचा डेटा तयार करण्यात आला होता. त्यानंतर तांत्रिक तपासादरम्यान हे मोबाईल महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये तसेच परराज्यात वापरात असल्याचे निष्पन्न झाले. शिवाजीनगर पोलिसांनी त्या त्या जिल्ह्यातील पोलिस ठाण्याशी संपर्क साधून सर्व मोबाईल हस्तगत केले.या सर्व मोबाईलची एकत्रित किंमत जवळपास ५ लाख रुपये इतकी आहे. स्वातंत्र दिनाच्या दिवशी पोलिसांनी या मोबाईलचे मूळ मालकांना परत देऊन नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला.

पुणे पोलिसांच्या वेबसाईटवर (punepolice.gov.in/LostFoundReg) जाऊन तक्रार नोंदवावी. तक्रारीची प्रिंट काढून ती जवळच्या पोलिस स्टेशनमध्ये द्यावी. मोबाईलसाठी नवीन सिमकार्ड घ्यावे व ते चालू करावे. त्यानंतर CEIR पोर्टलवर (www.ceir.gov.in) नोंदणी करून मोबाईल ब्लॉक/ट्रॅक करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमवार दिनांक 18/08/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# 10 मीटर एअर रायफल स्पर्धेत हरियाणाच्या दीपक सैनीला सुवर्ण पदक

## एजीसी स्पोर्टस पॅरा खेलोत्सव पॅरा एडिशन २०२५ दिवस सातवा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे येथे सुरू असलेल्या एजीसी स्पोर्टस पॅरा एडिशन २०२५ मध्ये रविवारी झालेल्या पुरुषांच्या 10 मीटर एअर रायफल स्टँडिंग (SH1) स्पर्धेत हरियाणाच्या दीपक सैनीने सुवर्ण पदकाची कमाई केली.

तसेच या स्पर्धेत कर्नाटकाच्या राकेश एन. निदागुंडी याने रौप्य पदक तर कर्नाटकाच्याच सचिन सिद्दन्नावर याने कांस्य पदक पटकावले.



विशेष म्हणजे शेवटच्या फेरीपर्यंत अंतिम सामना चुरशीचा रंगला होता. यात हरियाणाच्या दीपक सैनीने अफलातून नेमबाजी करत सुवर्ण पदक आपल्या नावावर केले.११ ऑगस्टपासून सुरू झालेली एजीसी स्पोर्टस पॅरा एडिशन २०२५ ही स्पर्धा पॅरा अॅथलिट्सना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी मोठे व्यासपीठ ठरत आहे. विविध राज्यांतील पॅरा खेळाडू यात सहभागी झाले असून, त्यांच्या खेळातील जिद्दीमुळे स्पर्धेला वेगळाच रंग आला आहे.

या स्पर्धेचा समारोप उद्या, १८ ऑगस्ट रोजी होणार असून विजेत्या स्पर्धकांना बक्षिसांचे वितरण करण्यात येणार आहे. त्यामुळे अंतिम सामने पाहण्यासाठी जास्तीत जास्त पुणेकरांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# 'आप'तर्फे दहीहंडी सोहळा - उत्सव, समाजकार्य आणि शैक्षणिक उपक्रमांची सांगड

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : आम आदमी पार्टी महाराष्ट्र राज्य व पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने आयोजित भव्य दहीहंडी सोहळा अतिशय उत्साहात आणि दणदणीत वातावरणात पार पडला. गोविंदा पथकांच्या थरारक कलाबाज्या, श्रीकृष्ण जयघोषांचा गजर आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर रंगून गेला.



या अविस्मरणीय सोहळ्याला मान्यवरांची गौरवशाली उपस्थिती लाभली. प्रमुख पाहुणे म्हणून मा. अजितजी फाटके (कार्याध्यक्ष, आप महाराष्ट्र प्रदेश), सिद्धेश भैय्या भगत (राष्ट्रीय उपाध्यक्ष, युवा आघाडी), मा. अमित भाऊ म्हस्के (महाराष्ट्र राज्य समन्वयक) व मा. मयूर दौंडकर (युवक प्रदेश अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य) यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक व दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा वाढदिवस दहीहंडी सोहळ्याच्या निमित्ताने साजरा करण्यात आला.

तसेच या सोहळ्याला सामाजिक व शैक्षणिक अधिष्ठान देत काही दिवसांपूर्वी पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष रविराज काळे यांनी जाहीर केलेल्या शिष्यवृत्ती वितरणाचा कार्यक्रमही संपन्न झाला. काई. मुक्ताबाई रामचंद्र बालवडकर यांच्या स्मरणार्थ दिली जाणारी सावित्रीबाई फुले स्कॉलरशिप कु. रसिका गायगोले हिला प्रदान करण्यात आली. तर काई. शंकर नारायण घोडके यांच्या स्मरणार्थ दिली जाणारी महात्मा जोतिबा फुले स्कॉलरशिप, ची. सुरज सोमुसे आणि ची. सुजल जौजाळकर यांना देण्यात आली.

हा सोहळा केवळ परंपरेपुरता मर्यादित न राहता परंपरेचा वारसा, सांस्कृतिक जपणूक आणि शैक्षणिक संदेश देणारा उपक्रम ठरला. विद्यार्थ्यांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला चालना मिळावी, नव्या पिढीला प्रोत्साहन मिळावे तसेच समाजाच्या दृष्टीने हिताचे निर्णय राबवले जात असल्याचा संदेश देण्यात आला.

या दहीहंडी सोहळ्याचे यशस्वी आयोजन आम आदमी पार्टी पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष रविराज काळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. सर्व गोविंदा पथकांना, आयोजक मंडळाला व नागरिकांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल आम आदमी पार्टीच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968